# तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयात सायबर गुन्हेगारी विषयी पथनाट्यातून जागृती




उस्मानाबाद दि. २७ (प्रतिनिधी) – येथील तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये सायबर गुन्हेगारी विरोधी जनजागृती करण्यात आली.

महाविद्यालयातील विद्यार्थी व कर्मचारी यांना समाजामध्ये कशा पद्धतीने सायबर गुन्हेगारी घडते ? याविषयी जिल्हा पोलिस दल व क्विक हिल फाउंडेशनच्या माध्यमातून पथनाट्यद्वारे जनजागृती केली. खास अभियांत्रिकी महाविद्यालयात आयोजित केलेल्या या कार्यक्रमासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी हे स्वतः उपस्थित होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मैदानावर घेतलेल्या या कार्यक्रमांमध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने, सर्व विभाग प्रमुख व सर्व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी म्हणाले की, सायबर क्राईम बाबत प्रत्येकाने सतर्कता बाळगली पाहिजे. विद्यार्थ्यांनी तर स्वतः सतर्कता बाळगून आपले नातेवाईक, पेन्शनर यांना जागृत केले पाहिजे. कारण पेन्शनर, सीनियर नागरिकांमध्ये फसवणुकीचे वारंवार प्रकार आपण समाजामध्ये पाहतो. चुकून एखाद्याच्या बाबतीत अशी सायबर फसवणूक घडली तर तात्काळ संबंधित सायबर विभागाशी संपर्क केल्यास पुढील अनर्थ टळू शकतो व रिकव्हरी होऊ शकते असे त्यांनी सांगितले. तर प्राचार्य डॉ. माने म्हणाले की, अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या २०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सायबर सिक्युरिटी संबंधी सिस्कोचा कोर्स पूर्ण केला असून १०० विद्यार्थ्यांनी इंटरशिप पूर्ण केल्यामुळे ते विद्यार्थी इतरांना याविषयी सजग करू शकतात असे नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय मैंदर्गी यांनी तर संयोजन प्रा. प्रमोद तांबारे यांनी केले. या पथनाट्यानंतर कुलकर्णी यांनी तेरणा रेडिओ स्टेशन, सिस्को सेंटर व नुकतेच सुरू केलेल्या ड्रोन सेंटरला भेट दिली. महाविद्यालयाचे व्यवस्थापन विद्यार्थ्यांना देत असलेल्या सुविधा पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. तसेच तेरणा रेडिओ सेंटरमध्ये मुलाखत देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला.